# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org


क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३५०/प्रनिप्रा/७ ऑक्टोबर/२०२४/6142-A दिनांक : 08 OCT 2024

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. न्या. वि.एल. अचलिया (से.नि.) (अतिरिक्त कार्यभार), अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, दिनांक ७ ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी ०३:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त,-

सदरील बैठकीस प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे), २) श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व ३) श्री. दिलीप सरदेसाई (भा.प्र.से.), सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.हे अनुपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १ : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या परिक्षेस बसण्यास अथवा परिक्षेचा निकाल जाहिर करण्याच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या विनंतीबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी विशेष संवर्गातून तसेच संस्थात्मक / व्यवस्थापन / अनिवासी भारतीय कोटयातून (एनआरआय) प्रवेशित व संस्था स्तरावरील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांची पुनश्च तपासणी करण्याकरिता उपसमिती गठित करण्यात आली होती व तद्नुषंगाने उपसमितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या दिनांक २१/०८/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले. सदरील निर्णय सर्व संबंधितांना दिनांक ०९/०९/२०२४ रोजीच्या ईमेलद्वारे अवगत करण्यात आले आहेत.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

*"तथापि, महाविद्यालयांकडून सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची / माहितीची मा. अध्यक्ष महोदय यांनी आढावा घेऊन प्रस्तूत प्रकरणी मा. अध्यक्ष महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली तपासणी/छाननी करण्यात आली व त्यानुसार सदरील अहवालास अंतिम प्रारुप देण्यात आले, तथापि ज्या प्रवेश प्रकरणी त्रुटी निदर्शनास आढळुन आल्या नाहीत, अशा प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. (प्रपत्र -फ)*

***तसेच प्रवेशामध्ये त्रुटी असणारे व कागदपत्रे सादर न केलेल्या / गैरहजर असलेल्या महाविद्यालयांचे प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत. तथापि अशा प्रवेशांबाबत महाविद्यालयांनी पूर्तता केल्यानंतर सदरील प्रवेशांची तपासणी/छाननी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या स्तरावर करुन उचित कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा."***

प्राधिकरणाच्या निर्णयास अनुसरुन ज्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली नाही, त्यापैकी खालील महाविद्यालयांनी संबंधित विद्यार्थ्यांना परिक्षेस बसण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली,-

१) पंडित दिनदयाल उपाध्याय दंत महाविद्यालय, सोलापुर यांचे दिनांक २४/०९/२०२४ व ०३/१०/२०२४ रोजीचे पत्र (पदवी व पदव्युत्तर दंत अभ्यासक्रम).

२) आदित्य दंत महाविद्यालय, बीड यांचे दिनांक ३/१०/२०२४ रोजीचे पत्र (पदवी व पदव्युत्तर दंत अभ्यासक्रम).

३) शिवतेज आरोग्य सेवा संस्थेचे योगिता दंत महाविद्यालय, खेड, रत्नागिरी यांचे दिनांक २/१०/२०२४ रोजीचे पत्र (पदवी व पदव्युत्तर दंत अभ्यासक्रम).

४) स्व. श्री. यशवंतराव चव्हाण स्मृतीचे वैद्यकीय व रुरल डेवलपमेंट फाऊडेंशनचे दंत महाविद्यालय, अहमदनगर यांचे दिनांक ३/१०/२०२४ रोजीचे पत्र (पदवी व पदव्युत्तर दंत अभ्यासक्रम).

प्रस्तूत प्रकरणी उक्त नमूद तसेच उर्वरित महाविद्यालयांच्या प्रवेशांतील त्रुटींबाबत संबंधितांना कळविण्याचे निर्देश देण्यात आले व तद्नंतर महविद्यालयांनी त्रुटींची पूर्तता करणे अपेक्षित होते. परंतू संबंधित महाविद्यालयांनी त्रुटी पूर्तता करण्याची कार्यवाही अद्याप पर्यंत करण्यात आलेली नाही. तसेच उपरोक्त विषयासंबंधी सांगोपांग चर्चा होऊन संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला,-

(१) उपरोक्त ०४ महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांना ५/१०/२०२४ पासून होणाऱ्या विद्यापीठाच्या परिक्षेस बसण्यास खालील अटीं/शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे,-

(क) संबंधित महाविद्यालयांना प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणांमध्ये असलेल्या त्रुटीं कार्यालयाकडून ०७ दिवसांत लेखी स्वरुपात कळविण्यात यावे.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

(ख) संबंधित महाविद्यालयांनी सदरील त्रुटी पूर्तता प्रकरणी विद्यार्थ्यांचे प्रवेश मान्य करण्याचा प्रस्ताव त्रुटी पुर्तता कागदपत्रांसह दोन आठवडयात प्राधिकरणास सादर करावा.

(ग) संबंधित महाविद्यालयांनी सादर केलेल्या त्रुटी पूर्तता प्रस्तावांची छाननी करुन प्राधिकरणाकडे निर्णयाकरिता तातडीने सादर करावे.

(घ) संबंधित महाविद्यालयाने विहित मुदतीमध्ये त्रुटी पुर्तता प्रस्ताव सादर न केल्यास पुढील कार्यवाहीसाठी प्रकरण प्राधिकरणाकडे सादर करण्यात यावे.

(ङ) संबंधित विद्यार्थी यांचे परिक्षेचे निकाल पुढील आदेश होईपर्यंत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी जाहिर करण्यात येऊ नये.

(२) प्राधिकरणाच्या दिनांक २१/०८/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार ज्या महाविद्यालयांचे प्रवेश कागदपत्रांच्या त्रुटीं कारणास्तव ना मंजुर करण्यात आलेले आहेत, अशा महाविद्यालयांनी त्रुटी पूर्ततेचा प्रस्ताव ०२ आठवडयात (१५ दिवसांत) सादर करण्याबाबत लेखी स्वरुपात कळविण्यात यावे. तसेच अशा महाविद्यालयांनी त्रुटी पूर्ततेचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे सादर केल्यास प्राधिकरणाच्या दिनांक २१/०८/२०२४ रोजीच्या निर्णयानुसार प्रस्तावाची छाननी / पडताळणी करुन प्राधिकरणाकडे निर्णयाकरिता सादर करावे.

(३) तथापि जी महाविद्यालये वरील प्रमाणे त्रुटी पूर्ततेचा प्रस्ताव सादर करणार नाहीत, अशा महाविद्यालयांची यादी पुढील कार्यवाहीकरिता प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक २ : विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांकडून गैरप्रकारे / निष्काळजीपणामुळे झालेल्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाने दंड आकारणी करुन मान्य करण्यात आलेल्या प्रवेश प्रकरणी सदरील दंडाची रक्कम क्षमापित करण्याबाबत सादर केलेल्या विनंतीबाबत.**

विषयांकित प्रकरणी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सविस्तर माहिती सादर केली. प्रपत्र-अ मधील नमूद एकुण ९१ महाविद्यालयांनी तत्कालीन प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी ठोठावलेल्या दंडाची रक्कम क्षमापित करण्याबाबत विनंती केली आहे.

या संदर्भात सांगोपांग चर्चा करण्यात आली. संबंधीत महाविद्यालयांनी अधिनियम २०१५ च्या तरतूदींचे पालन करण्यास केलेली कसुर, तसेच संबंधित कायद्यातील तरतूदीं व नियमाचे उल्लघंन केल्यामुळे दंड ठोठावण्याचा निर्णय घेण्यात आला. अशा प्रकारे ठोठावण्यात आलेल्या दंडाचा पुनर्विचार करुन ठोठावण्यात आलेला दंड क्षमापित करण्याची तरतूद अधिनियम २०१५ मध्ये नाही. या कारणास्तव प्रपत्र-अ मधील नमूद केलेल्या महाविद्यालयांकडून दंड क्षमापित करण्याची विनंती अमान्य करण्याचे ठरविण्यात आले. अर्ज नाकारल्या प्रकरणी संबंधित महाविद्यालयांना कळवून देय असलेल्या दंडाची रक्कम दोन आठवडयात भरण्यास कळविण्यात यावे. दंडाची रक्कम न भरणाऱ्या महाविद्यालयांची यादीसह सविस्तर टिपणी पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक ३:** **मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

(क) **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क निश्चितीबाबत.**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६(३) मधील तरतूदीन्वये प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क वेळोवेळी निश्चित करण्यात आलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ व २०२३-२४ मधील प्रक्रिया शुल्क निश्चितीबाबत मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या अनुक्रमे दिनांक २५/११/२०२२ (निर्णय बाब क्रमांक ४(क) व ३१/०८/२०२३ (निर्णय बाब क्रमांक ४(च)) रोजीच्या बैठकीमध्ये खालील प्रमाणे "प्रक्रिया शुल्क" निश्चितीबाबत निर्णय घेण्यात आला आहे,-

अ) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या कोटयातील विद्यार्थी प्रवेश क्षमतेकरिता प्रति विद्यार्थी रु. १००/- परंतू रु. २०,०००/- पेक्षा कमी नसावे.

ब) अनिवासी भारतीय कोटा (NRI) विद्यार्थी प्रवेशाकरिता प्रति विद्यार्थी रु. ३०००/-

क) व्यवस्थापन कोटा (Management Quota) / संस्थास्तरीय कोटयातील (Institutional Quota) विद्यार्थी प्रवेश क्षमतेकरिता प्रति विद्यार्थी रु. २०००/-

उक्त निर्णयानुसार खालील प्रमाणे सुत्र प्राधिकरणाच्या निर्णयानुसार निश्चित करण्यात आले आहे,-

| CAP Quota (Total Seats) | Over and above actual admissions of TFWS / EWS / PMSSS / J&K, etc. | Total (1+2) | Rs. 100 x No. of admissions shown in column No. (3), but not less than Rs. 20,000/- | No. Institutionl / Management Quota (Total Seats) x Rs. 2000/- | No. of Actual NRI admissions x Rs. 3000/- | Total Processing Fees (Column No. 4+5+6=7) |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| -- | -- | -- | -- | -- | -- | -- |

उक्त बाबी विचारात घेता मागील शैक्षणिक वर्ष शैक्षणिक वर्ष २०२३-२४ प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये वरील सुत्रानुसार प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" निश्चिती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील "प्रक्रिया शुल्क" आकारणीबाबत सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी उचित कार्यवाही त्वरीत करावी. तसेच संबंधित महाविद्यालयांना संबंधित संचालकांमार्फत कळविण्यात यावे.

(ख) **राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील वर्ग - ड संवर्गातील निव्वळ कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढीबाबत.**

आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर केलेल्या दिनांक ०४/१०/२०२४ रोजीच्या प्रस्तावाचे अवलोकन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली. सदर प्रस्तावामध्ये श्रीमती. रेखा रेडकर, सफाईगार व श्रीमती दिपिका सावंत, केअरटेकर या निव्वळ कंत्राटी तत्वावरील कार्यरत असून त्यांना अनुक्रमे रु. १३,८६०/- व रु. १३,२००/- मासिक मानधन देण्यात येत आहे. सदर कर्मचारी यांनी

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

त्यांच्या अर्जात असे नमूद केले आहे कि, कुटूंबाची सर्व जबाबदारी त्यांच्या एकटयावर असून देण्यात येणारे मासिक मानधन अपूरे असून त्यात वाढ देण्यात यावी.

सदरील प्रकरणी असे ठरविण्यात आले कि, हा विषय प्रशासकीय बाबींशी निगडीत असल्याने संबंधित प्रस्ताव सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्याकडे निर्णयार्थ सादर करण्यात यावा.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(न्या. वि.एल. अचलिया (से.नि.))
अध्यक्ष,
(अतिरिक्त कार्यभार)
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 08 OCT 2024